॥ श्री ॥
॥ बाबा ॥

नित्य येवोनिया भेटे तोचि त्याला
उल्हासीच्या तीरी खेळ मांडियेला॥ धृ ॥

घेऊनिया टाळ मुखी हरिनाम
नामाचा गजर सर्व सुखा ॥1॥

करोनिया ध्यान शुद्ध एक मन
सदा हरिभजन नित्य देहा ॥2॥

नमुनि गुरुस देहा सुखावले
कधि कळिकाळासी नाही दुरावले ॥3॥

स्वामी म्हणे माझा आहे सहजयोग
नामाचा महिमा वाढविन ॥4॥

★★★★★